म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय ग्रा. वा.
दा. क्र. 3930

# झुंझार महाराष्ट्र

IRBK-0103130
IRBK-0103130


म. ग्रं. सं. ठाणें
ार महाराष्ट्र
पुष्प १लें.
—बा. अ. देसाई
ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर, मुंबई ४.

दा. क्र. ३९३०

श्री ग्रंथ संग्रहालय
नों. क्र. ११५१३
नाव ९०१
वाचनालय

प्रकाशन क्रमांक २७

# झुंझार महाराष्ट्र

पुष्प १ लें

## अंधकारमय जीवन

लेखक
बा. अ. देसाअी

IRBK-0103130
IRBK-0103130

ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर, मुंबअी ४

प्रकाशक :
ग. पां. परचुरे
ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर
गोरेगांवकर चाळ क्र. २
गिरगांव मुंबई ४

सर्व हक्क ग. पां. परचुरे
यांचे स्वाधीन.

मुखपृष्ठ सजावट :
रघुवीर मुळगांवकर

प्रथमावृत्ति
१९४९

मुद्रक :
मा. कृ. सहस्रबुद्धे
श्रीज्ञानेश्वर प्रेस,
कोल्हापूर.

३७३० वा.वा.

# सुरवात करण्यापूर्वी

अंतःकरण थरारून सोडणाऱ्या भव्य प्रयत्नांची निपज स्फूर्तीशिवाय होणें शक्य नाहीं. अन् ती स्फूर्ति 'झुंझार महाराष्ट्रानें' गेलीं तीनशें वर्षें अखिल भारताला सतत दिली आहे. स्वामिभक्ति, देशसेवा नि आत्यंतिक त्याग यांनीं नटलेल्या मराठ्यांच्या इतिहासाचें प्रत्येक पान म्हणजे जाज्वल्य स्वाभिमानाचें फडकतें निशाण. या निशाणाखालीं जमलेल्या रांगडी सेनेनें आपल्या नेत्याचा प्रत्येक शब्द वा कृति प्रमाण मानून त्यासाठीं कशी कुर्बानी केली, हें वाचिलें म्हणजे ऊर अभिमानानें भरून येतो व अशा जगद्वंद्य विभूतींपुढें शिर आदरानें विनम्र होऊं लागतें.

आज महाराष्ट्राला त्या एकीची गरज आहे. त्यांच्यांत उत्साहाचें वारें शिरायला हवें नि तें 'संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनेंच' साध्य होणार आहे. संयुक्त महाराष्ट्राची घडण होण्यांत व्यक्ति आणि समष्टि यांचें कल्याण आहे.

हिंदुस्थान देश आदर्श व समृद्ध होण्यासाठीं त्याचे घटक तसे होणें इष्ट आहे. प्रौढप्रतापी श्रीशिवाजीमहाराजांचें नांव इतिहास–मंदिरांत अहर्निश दुमदुमत आहे, याचें कारण त्यांनीं अखिल हिंदूंसाठीं केलेलें महान् कार्य हें होय. त्यांत त्यांचा स्वार्थ होता, पण तो नाममात्र. भूषण कवीच्या शब्दांत सांगायचें म्हणजे शिवाजीमहाराज आले नसते तर "सुन्नत होत सबकी !"

परप्रांतांच्या समृद्धीसाठीं झटणें ही कांहीं मराठ्यांची आजकालची वृत्ति नाहीं; ती पूर्वापार चालत आली आहे. त्या वृत्तीची जोपासना थोर थोर ग्रंथकारांनीं केली आहेच. ते ग्रंथ थोरांसाठीं होते. बालांसाठीं प्रस्तुतचा हा छोटा प्रयत्न !

सदर माला गुंफतांना ठिकठिकाणीं नाट्याचा आविष्कार साधून पुस्तक कादंबरीप्रमाणें मनोरंजक व्हावें म्हणून वास्तवतेला धरून कांहीं काल्पनिक प्रसंग निर्मिले आहेत.

शेवटीं, ज्यांत जगण्याचा अभिमान वाटतो व ज्यासाठीं मरणाचें मोलसुद्धां अपुरें पडेल अशा ह्या माझ्या मायदेशाची सेवा करण्यास अखंड प्रयत्नाची प्रेरणा मला देवो अशी महाराष्ट्राच्या कुलदेवतेला सविनय प्रार्थना आहे.

सर्वांचा कृपाभिलाषी,

**बाळकृष्ण अ. देसाओ.**

ग्रा. नं. 902

# अंधकारमय जीवन

## १ कर्तव्याचा साक्षात्कार

घव्! घव्!! घव्!!!

उंच कड्यावरून खालीं कोसळणाऱ्या पाण्याच्या प्रचंड प्रवाहाकडे कितीतरी वेळ सारखी दृष्टि लावून एक तरुण उभा होता. त्याच्या चर्येकडं पाहातांच मनांत कसल्यातरी भयंकर विचाराचं काहूर माजून राहिलं आहे, हें तेव्हांच कळून यायला उशीर नव्हता. सायंकाळच्या सूर्याचीं सोनेरी किरणं त्या घनदाट दरींतून केव्हांच लुप्त झालीं होतीं, अन् त्या ठिकाणीं काळोखाचं आगमन अगदीं चोरट्या पावलांनीं हळूंहळूं होत होतं. बाह्यसृष्टींत अशा तऱ्हेनं झालेला बदल त्या तरुणाच्या गांवींहि नव्हता. विचाराच्या न संपणाऱ्या माला गुंफण्यांत त्याचं चित्त नि देह इतका तद्रूप झाला होता, कीं दुसऱ्या एका अवखळ तरुणानं त्याला गदगदां हालविलं नसतं, तर त्याला आपल्या देहाची शुद्धच राहिली नसती. त्याच्या शोधार्थ आलेल्या त्या दुसऱ्या तरुणानं भयभीत मनानं त्याला म्हटलं,

“ माल्या! इतका वेळ कुणाचं ध्यान लावून बसला होतास इथं! अरे, सारं रान धुंडाळलं, पायाची पायपीट केली नि भीतभीतच या वाघदरींत प्रवेश केला. वाटलं, पहाडावरून बेगुमान झेप घेणाऱ्या प्रवाहावर तहान भागविण्यास येणाऱ्या एखाद्या अल्लड भेकऱ्याची शिकार साधण्यास चोरपावलीं शिरला असशील; पण—पाहतों तों हातांत ना भाला ना बंदूक. वैतागून जीव तर द्यायला नव्हता ना आलास इथं!”

“ जीव द्यायला!” मिष्कीलपणं हंसून तो म्हणाला, “ अरे वेड्या, इथून आतां मी जीव घ्यायचीच तयारी करणार आहें बघ!”

" कुणाचे जीव घेण्याचा माथेफिरू विचार तुझ्या डोक्यांत डोकावत आहे बाबा ? " येशानं आश्चर्यानं विचारलं.

" लढाई करणार ! शत्रूंचीं शिरं उतरणार ! मर्दुमकी गाजवून वायां गेलेल्या आयुष्याचं पुरेपूर माप भरणार ! आतां वेळ गमाविण्यांत अर्थ नाहीं. सरली घडी पुन्हां येत नसते, म्हणून भावी काळ चमकदार होण्यासाठीं उद्यांपासूनच शिलेदार होणार नि भोसले कुल दैदीप्यमान करणार. येशा ! धबधब्यानं धकाधकींतून आक्रमिलेलं यशस्वी जिणं माझ्या आयुष्यांत जगण्याची उत्स्फूर्त झालेली कल्पना मी जोपासणार ! आतां तुम्हांआम्हांला अशी डोळेझांक करून कसं चालेल ? जवानी आहे तोंवरच करणीला वाव, नाहींतर तिचं नांवहि घेणं नको. ऐन तारुण्यांतील हीं पंचवीस वर्षं निव्वळ बसून घालविलीं याची आतां मला शरम वाटूं लागली आहे. बस्स् ! बस्स् झालं हें आरामी जिणं. वैताग आला आहे मला त्याचा अगदीं. माझ्या बंदुकीची गोळी यापुढं केवळ निरपराध हरणांची शिकार करण्यासाठीं न झाडतां तिनं मी माणसांतील मस्तवाल डुकरं पाडणार आहें. "

" अरे ! पण इथं असाच जर वेळ काढीत राहिलास तर एकादं पिसाट वाघरूं येईल नि त्याची शिकार होण्याऐवजीं तेंच आपली शिकार करील. म्हणून म्हणतों, आधीं घरीं जाऊं, नि मग वाटल्यास रात्रभर खळ्यांत विचार करीत बसूं ! "

" तूं म्हणतोस तर उचल पाऊल. पण, भीति दाखविण्याचा व्यर्थ अट्टाहास मात्र करूं नकोस यापुढं. आपण मर्द मराठे. बेगुमान नि बेडर बनलं तरच निभाव लागणार ! अरेच्चा ! रातकिडे किरकिरूं लागले. घुबडही घोघाऊं लागलं. रात्र बरीच झाली वाटतं ! चल लौकर. आपला होईल हा खेळ पण घरीं बाईल माणसांचा उडून जाईल जीव. फुरसतीनंच सर्व कांहीं घेऊं. "

घरची वाट चालत असतां त्या दोघांच्या कितीतरी गप्पा चालल्या होत्या. मालोजीच्या विपरीत बोलण्याचा येशाला राहून राहून अचंबा वाटे व एकदम असा ह्याच्यांत फरक कसा झाला याचा तो विचार करी;

पण त्याच्या टीचभर डोक्याला त्या गहन विषयाचं कोडं कांहीं केल्या उलगडेनाच. म्हणून तो म्हणाला, "आजच कसा काय रे हा विचार तुझ्या डोक्यांत उगवला?"

"त्याचं असं झालं." मालोजी सांगूं लागला, "आमच्याकडे आज आले होते सर्जेराव देशमुख पाहुणे. म्हणून खिरीचा बेत केला घरीं बाईल माणसांनीं. मग काय! पंगत अशी रंगली होती, कीं किती जेवलों तें कळलं देखील नाहीं! दुपारची वेळ. बाहेर पडलेला उन्हाचा कडाका. त्यामुळं आंगाची होऊं लागली लाही. कैफहि आला सपाटून, म्हणून पथारी पसरून जरा आडवा झालों ओसरीवर. पण झोंप कुठली यायला? म्हणून म्हटलं, फिरून यावं वाघदरीकडून. डोक्यांत विचार येण्याचा अवकाश तों निघालोंच तिकडं. इतक्यांत आपल्या बेगुमान वेगानं धब् धब् उड्या घेणाऱ्या प्रपाताकडं लक्ष गेलं. ते पाण्याचे लोट किंचित् आपल्या जिवाची पर्वा न करतां पुढं पुढं झेपावत होते नि काळ्याकिट्ट कपारींना, मार्गांत आड येणाऱ्या त्या राक्षसांना जोरानं थडका लगावून विजयाच्या उन्मादानं, विजेत्याच्या तोऱ्यांत बेगुमान मार्ग आक्रमीत होते. क्षुद्र जल-बिंदु एकीच्या बळावर केवढं कार्य करतो हें पाहून मन इतकं गुंगलं, कीं तूं जर तिथं आला नसतास तर माझी किती वेळ तिथं समाधि लागून राहिली असती कुणास ठाऊक!"

अशाच प्रकारचीं त्या दोघांचीं कितीतरी बोलणीं चाललीं होतीं. इतक्यांत त्यांचीं घरं आलीं नि बोलणीं तेवढ्यावरच थांबलीं.

★

## २ अंधारांत चांचपडणारीं मराठा कुळें

तेराव्या शतकाच्या अखेरीस अल्लाउद्दिनानं रामदेवरावावर स्वारी करून त्याला जिंकलं नि महाराष्ट्रांत आपले आसुरी पाय रोविले. तेव्हां-पासून राजसत्ता हळूंहळूं त्यांच्या हातीं गेली; व मुसलमानांची संख्या वाढूं लागली. पण त्या मुसलमानांत विशेष कडवेपणा नव्हता. कारण त्यांच्या-पैकीं कित्येक हिंदूंतून बाटूनच मुसलमान झालेले होते.

कित्येक शतकें हिंदु संस्कृतींत ते मुरलेले असल्यामुळं त्यांच्यांत हिंदूंचे रीतिरिवाज चालू होते. ते हिंदूंच्या देवांना नवस करीत व नवरात्रासारखे उत्सवही मोठ्या प्रेमानें साजरे करीत. या बाटग्या मुसलमानांव्यतिरिक्त समुद्रमार्गें कांहीं मुसलमान सालोसाल येत होते, पण त्यांची संख्या लक्षांत येण्यासारखी नव्हती. प्रमाणानं ते अत्यल्प असल्यामुळं त्यांना स्वतंत्ररीत्या कांहींच करतां येत नसे. वांशिक श्रेष्ठतेमुळं ते स्वतःस उच्च मानीत व अधिकाराच्या जागांबद्दल मूळच्या मुसलमानांशीं झगडत. यामुळं नेहमीं त्यांच्यांत चुरस चालत असे.

तलवारीच्या जोरावर धर्मप्रसाराचं खूळ मनांत बाळगीत असलेल्या वेड्या पीरांना इतर धर्मियांच्या नाजुक भावना जाणण्याची बुद्धीच फार थोडी असते. धर्मप्रसारासाठीं जुलूमजबरदस्ती, धाकदपटशाही करणं त्यांना हातचा मळ वाटतो. आणि म्हणूनच दक्षिणेंत पाय रोविल्यापासून हिंदूंच्या असहाय स्थितीचा व जातिभेदाचा पुरेपूर फायदा घेण्याचं त्यांनीं ठरविलं. हिंदूंना सक्तीनं बाटविणं, त्यांच्या मुली पळवून त्यांच्यांशीं निका लावणं हे प्रकार राजरोस सर्रास सुरू झाले. त्यांच्याविरुद्ध कुणालाच ब्र काढणं मुष्किलीचं झालं होतं. खालपासून वरपर्यंत सर्व अधिकारी त्यांचे आणि राजेही तेच. यामुळं अधिकाराच्या नि पैशाच्या जोरावर त्यांनीं महाराष्ट्रांत हिंदुधर्माची पद्धतशीर गळचेपी चालविली होती. प्रथम दर्शनीं त्यांचा हा दुष्ट कावा मानी मराठ्यांना ओळखतां आला नाहीं; कारण त्यांच्याचपैकीं कांहीं चळवळ्यांना त्यांनीं हाताशीं धरून कुणाला सरदार, कुणाला सेनापती तर कुणाला प्रधान नेमून रुपेरी शृंखलांनीं व मनसबदारीच्या गोड घांसांनीं त्यांचीं तोंडं नि हातपाय जखडून टाकिले.

साधारण मनुष्य स्वार्थांत गुरफटला, कीं दुसऱ्याच्या बऱ्यावाईटाकडे त्याचं दुर्लक्ष होतं. हिंदुधर्माची प्रत्यहीं होत जाणारी गळती हें एक ठळक उदाहरण आहे. डोळे असून आंधळ्याप्रमाणं त्यांनीं हा प्रकार सतत तीनशें वर्षं सहन केला होता. त्यांना आपल्या धर्मरक्षणाची दिक्कत वाटली नव्हती. उघड्या जगांत उघडयानं हा सारा प्रकार होत होता.

स्वामिभक्ति हा मराठ्यांच्या आंगचा मोठा गुण खरा; पण त्या काळीं नेमका तोच त्यांच्या मुळावर आला होता. ‘ज्याची खावी पोळी,

त्याची वाजवावी टाळी ' यापलीकडे त्यांच्या विचाराची किंवा आचाराची मजल जात नव्हती. जातीनं शिणून यवनांच्या मशिदी उभाराव्या, पण स्वतःच्या देवदेवळांच्या भ्रष्टतेचा विचारही करण्यास वेळ मिळू नये यासारखं दुर्दैव तें कोणतं ? आणि हें सर्व धुरंधर मराठ्यांच्या हातून घडत होतं, हेंच नवल !

बहमनी राज्याचीं शकलं झाल्यावर, दक्षिणेंतील त्या मुसलमान शाह्यांच्या पडत्या काळांत मराठे सरदारांस मोठं महत्त्व प्राप्त झालं. पातशहांच्या पदरीं जे मुसलमान होते त्यांच्यांत उत्तरेकडील व दक्षिणेकडील असे भाग असत. त्यांची परस्परांबद्दल सारखी कुरबूर असायची. पातशहाला दोन्ही प्रिय. कोणावरच त्याचं वजन नव्हतं, म्हणून त्यांच्या भांडणांत पडून तें निभावण्याची ताकद नसल्यानें आपल्या राज्याचा नि अधिकाराचा बोज राखण्यासाठीं तिसरा तितकाच प्रबल पक्ष निर्माण करून ठेवणं अवश्य होतं. यामुळं मुसलमान पातशहा मराठ्यांना चुचकारून त्यांना पदरीं बाळगीत व त्यांच्या जोरावर आपली अनिर्बंध सत्ता महाराष्ट्रभर चालवीत.

मराठा मानी आहे. तेवढा त्याचा मान सांभाळला, कीं त्याच्याकडून गगनाला गवसणी घालण्यासारखीं बिकट कामेंही करून घेतां येतात याचा मुसलमानांना गेल्या तीनशें वर्षांचा अनुभव होता. शिवाय ते फौजबंद होते. एकाद्या प्रमुखाला हाताशीं धरलं कीं, त्याच्या हुकमतीखालीं वावरणाऱ्या हजारों लोकांचा तांडा त्याच्या सेवेला सदा तयार असतो आणि त्याच्या जिवावर वाटेल तो दिग्विजय करतां येतो हें मुसलमानांना पूर्णपणें अवगत होतं; म्हणूनच मुसलमानी अंमलांत मुसलमान राजांच्या पदरीं मोठ्या हुद्याच्या जागांवर हिंदूंची वर्णी लागे.

अशाच एका प्रमुख मराठा घराण्यांत इ. स. १५३३ त बाबाजी भोसल्याचा जन्म झाला. भोसले घराण्याचं मूळ चितोडच्या शिसोदे या नांवाच्या मानी व शुद्ध राजघराण्यांत सांपडतं. अल्लाउद्दीन खिलजीशीं दोन हात करणारा चितोडचा मानी राजा लक्ष्मणसिंग याचा नातू सुजनसिंह चितोड सोडून निघाला. त्याचा वंशज देवराजजी पंधराव्या शत-

काच्या सुरवातीस दक्षिणेंत आला. त्याच्या कुळांत भोसाजी म्हणून कर्तृत्ववान् पुरुष होऊन गेला. त्याच्या नांवावरून ह्या कुळास भोंसले हें आडनांव पडलं.

भोंसले घराण्यांतील पुरुष भीमेच्या कांठीं हिंगणी, बेरडी, देऊळगांव वगैरे गांवच्या पाटिलक्या करून राहात असत. बाबाजी भोसले हा वेरूळ व त्याच्यासभोंवतालच्या आठदहा गांवची पाटिलकी सांभाळीत असे. शिवाय त्याला निजामशाहींत सरदारकी होती ती वेगळीच. म्हातारा हाडपेरानं मजबूत नि मोठा करारी होता. पाटिलकीचा व्याप सांभाळून त्यानं आपल्या दोन पोरांस चांगलं मल्लासारखं वाढविलं होतं.

मालोजी हा वडील मुलगा इ. स. १५५० त व विठोजी त्याच्या-मागून तीनचार वर्षांनीं वेरूळ येथें जन्मला. दोघां भावांचं एकमेकांवर रामलक्ष्मणासारखं प्रेम होतं. जमीन मुबलक. पीक दांडगं नि खायला माणसं मोजकीं. यामुळं बाबाजीच्या घरीं सुबत्ता नांदत होती. म्हणूनच या दोन पोरांना तिन्ही त्रिकाळ पोटभर खाऊन गांवभर भटकणं नि आखाड्यांत जाऊन शरीर कमाविणं याशिवाय दुसरं तिसरं काम नव्हतं.

मालोजी उणापुरा साडेसहा फूट उंच. सरळ बांध्याचा व कणखर हाडपेराचा सुखांत वाढलेला पोर. त्याच्या ठिकाणीं हत्तीचा डौल यावा यांत नवल नव्हतं. वयाच्या सत्तावीस वर्षांपर्यंत जोखमाचीं किंवा त्रासाचीं कांहींच कामं त्यानं केलीं नसल्यामुळं त्याच्या फुलत्या, उमद्या चेहऱ्यावर राकटपणाची जरासुद्धां छटा दिसून येत नव्हती. उन्हातान्हांतून, शिकारी-साठीं रान काढण्याकरितां जेव्हां हीं दोन पोरं गांवकऱ्यांबरोबर बाहेर पडत, तेव्हां म्हाताऱ्याच्या काळजाचं पाणी होऊन जाई. न जाणों, साव-जाचा माग काढतांना शिकारीच्या नादांत कुठं डोंगरकपारींत पडतील, ठेंचाळतील किंवा एकाद्या रानडुकराची धडक आंगावर येऊन त्यांचा चेंदामेंदा होईल म्हणून प्रत्येक वेळीं त्यांना मोडता घालण्याचा तो प्रयत्न करी. पण वारा पिऊन मोकळेपणानं उडया मारणाऱ्या वांसराला दावं लावण्याचा प्रयत्न जसा निष्फळ ठरतो, तोच अनुभव मुलांच्या बाबतींत म्हाताऱ्याला येई. आणि म्हणूनच मायेचा धागा अधिक ताणण्याचा तो प्रयत्न करीत नसे.

902

लहान मुलांना जोंवर त्यांनीं बाहेरचा मुलुख पाहिला नाहीं तोंवरच घरांत डांबून ठेवणं शक्य होतं. पण पंख फुटलेल्या पिलाला तूं उडूं नकोस, बाहेर अफाट जग आहे असं जीव तोडून ओरडून सांगितलं असतांहि त्याचा उपयोग होत नसतो. वास्तविक तसं सांगणंच गैर असतं.

मालोजी व विठोजी यांना पंख फुटले होते. त्यांना स्वतःच्या हिता-हिताचं कळूं लागलं होतं. त्यांच्या अवखळ स्वभावाला अडसर घालणं पुरानं बेफाम वाहणाऱ्या नदीला बांध घालून अडविण्यासारखं होतं.

एकदां वेरूळ गांवांतील एकाच वयाचीं सर्व पोरं ग्रामदेवतेच्या देव-ळांत दुपारच्या वेळीं शिकारीचा विचार करण्यासाठीं जमलीं होतीं. बंदुका कोणीं उडवाव्यात, रान कोणीं काढावं, कोणीं कोणत्या दिशेला उभं राहून आरोळ्या ठोकाव्या वगैरे सावज मिळविण्याच्या साधनांचा ते उहापोह करीत असतां निजामशाहींत बरेच दिवस घालविलेला शेजारच्या गांवचा हणमंत्या पाटील त्यांच्यांत येऊन बसला. पोरांचा बेगुमान उत्साह पाहून नि त्यांतल्या त्यांत मालोजीचा आवेश व पुढारीपण न्याहाळून हा पोर जर लष्करांत शिरेल तर थोरपणीं हिंमतबाज झाल्याविना राहाणार नाहीं अशी मनाशीं त्यानं खूणगांठ बांधली. त्यानें त्या मुलांच्या फुलत्या मर्दुम-कीचा सुवास पसरावा म्हणून निजामशाहींतील कित्येक बहारदार प्रसंगांचं वर्णन त्यांच्यापुढं केलं, नि तुमच्यासारख्या पोरांनीं केवळ रानं न धुंडा-ळतां मनगटाच्या जोरावर मुसलमान पातशाहींत झेंपतां येतील त्या जागा अडकवून मनसबदाऱ्या नि जहागिऱ्या मिळवाव्या असं ठासून सांगितलं.

कांहीं उनाड पोरांनीं पाटलाच्या ह्या कळकळीच्या भाषणाची टर उड-विली, पण सर्वांच्या मध्यभागीं बसलेल्या मालोजीच्या कानाला त्या शब्दांनीं तापलेल्या तेलाप्रमाणं चटका लावून सोडिला.

यानंतर पुष्कळ वेळ अशाच कांहीं गोष्टी होऊन त्यांची बैठक उठली. मात्र त्यावेळीं कोणीही शिकारीसाठीं म्हणून बाहेर पडला नाहीं. जो तो मालोजीच्या मागून निमूट आपापल्या घरीं गेला. आपला पुढारी एवढा बोलका असून आजच असा अबोल कां झाला याचं गूढ मात्र कुणालाच उकललं नाहीं.

घरीं आल्यावर मालोजी व विठोजी रात्रीं अंगणांत बराच वेळ आकाशींची दौलत पहात लोळत पडले होते. इतक्यांत येशा नि हरबा तिथं आले. त्यांनीं मालोजीची दुपारच्या वागणुकीबद्दल थट्टा आरंभिली. प्रथम कांहींएक न बोलतां बराच वेळ ऐकून घेतल्यावर त्यांच्यावर लटकेंच रागं भरल्याचा आविर्भाव आणून गंभीरतेच्या स्वरांत तो म्हणाला,

" गड्यांनो ! साऱ्याच गोष्टी कांहीं थट्टेवारी न्यायच्या नसतात. दुपारच्या पाटलाच्या बोलण्यांत वावगं तें काय होतं ? विचार करा. आपलीं हीं हत्तीसारखीं शरीरं घरच्या म्हातारीचा काळ बनण्यासाठींच का पोसलीं आहेत ? मीं निश्चय केला आहे —"

" काय निश्चय केला आहेस ? परवां वाघदरींत बोलून दाखविलास तो तर नव्हे ? " हरबानं त्याचं बोलणं मधेंच थांबवून विचारलं.

भरवेगानं पळणारी मोटर अचानकपणं उद्भवणाऱ्या अडथळ्यामुळं ब्रेक लावून खाडकन् उभी करावी लागते, तद्वत् मालोजीच्या बोलण्याचा ओघ हरबाच्या प्रश्नानं एकदम थांबला; व तो शांतपणं त्यांनाच विचारूं लागला, " खरंच ! मी कसला बरं निश्चय केला आहे ? माहीत आहे तुम्हांला ? वेड्यांनो ! घाई नको. माझा निश्चय मी तुम्हांला दोन दिवसांनीं अगदीं ह्याच वेळीं ह्याच ठिकाणीं सांगेन. मला तो पक्का केला पाहिजे. महत्कार्यांचा निर्णय घ्यायला मध्यें चोवीस तास पाहिजेतच ! आतां आपण आकाशांतील मौजा पाहूं या ! तो बघ मृग. नि तो दक्षिणेकडं तेजानं झळाळणारा व्याध. कसा धनुष्य सज्ज करून मृगापाठीं लागला आहे ! तो मृग त्याला मिळेल नि उत्तम शिकारी, अचूक नेमबाज म्हणून त्याचं नांव होईल. तुम्ही आम्ही जमिनीवरचीं माणसं माना उंचावून व डोळे ताणून त्याचं कौतुक करूं नि म्हणूं शाब्बास ! खाशी मजा उडविली. शिकारीची लूट साधली. "

मालोजीच्या गोष्टिवेल्हाळ मुखांतून बाहेर पडणारे शब्द कानांत सांठवून ठेवण्यांत त्या दुकलीला व विठोजीला किती रात्र उलटली हें कळलं देखील नाहीं. घरीं जातांना हरबा ' परवां ' घेतल्या जाणाऱ्या निर्णयाचे धागेदोरे विणण्याचा प्रयत्न करीत होता, तर येशा मालोजीच्या पत्रावळी-

शेजारीं आपला द्रोण लागल्याशिवाय खास राहाणार नाहीं हें मनाला पटवीत होता.

★

## ३ महत्त्वाचा निर्णय

माणूस एकदां विचारचक्रांत सांपडला कीं तो बेचैन होतो, व त्यांतून बाहेर पडण्यास प्रयत्नांची शिकस्त करतो. पाटलाच्या देवळांतील बोलण्यानं मालोजीला अस्वस्थ करून सोडलं होतं. त्यानें मनाचा हिय्या करून ती गोष्ट आपल्या बापाजवळ काढिली व आपण निजामशाहींत जाऊन नोकरी धरणार असं निक्षून सांगितलं.

बाबाजीला मालोजीचं म्हणणं रुचलं नाहीं. तो काळ धामधुमीचा होता. लढाया, मारामारीशिवाय एकही दिवस सुना जात नव्हता. सुखांत नि ऐषआरामींत वाढलेल्या आपल्या मुलांनीं निष्कारण दुःखांत जाऊन पडावं हें त्याच्या प्रेमळ हृदयाला रुचलं नाहीं. आपली पाटिलकी मोठी आहे, उत्पन्नही दांडगं आहे, मानमरातबही मोठा आहे, एवढं सांभाळलं म्हणजे एकच काय, पण तीन पिढ्या सुखानं जेवतील; असं असतां वेगळ्या उद्योगाची जरूरीच काय ? असा त्याचा प्रश्न पडे.

क्षत्रियाला आपल्या शक्तीचा दिमाख दाखविण्यास मिळाला, म्हणजे त्याच्या आयुष्याचं सार्थक होत असतं. बापाचे सुखासीन विचार मालोजीच्या तडफदार वृत्तीला रुचले नाहींत. धनदौलत सांभाळून आयुष्य वेंचणं एवढंच क्षत्रियाचं ध्येय नसून रणांगणांत आंगचं तेज दाखवून दिगंत कीर्ति पसरण्यांत असतं. अनाथांना सनाथ करून लाखांचा पोशिंदा होण्यांतच क्षत्रियाचं खरं जीवन शोभून दिसतं ही त्याची प्रामाणिक समजूत होती.

मालोजीचा हट्ट सकाळपासून चालला होता. त्यांत बाबाजीकडं कांहीं कामानिमित्त आलेल्या सर्जेराव देशमुखांच्या उपदेशाची भर पडली. सर्जेराव पडले वीरवृत्तीचे भोक्ते. आपल्या नात्यागोत्यांत कोणीतरी

शिकंदर नशिबाचा पुरुष निपजावा ही त्यांची इच्छा. त्यांनीं बाबाजीला प्रेमानं म्हटलं,

“ मुलाचा जर सैन्यांत जाऊन पराक्रम गाजविण्याचा हेकाच असेल तर त्याला तुम्ही आड कां येतां ! इच्छाशक्ति यशस्वितेची जननी असते. कोणाचं नशीब केव्हां कसं उघडतं हें सांगतां येत नसतं. म्हटलंच आहे—‘ स्त्रियश्चरित्रं पुरुषस्य भाग्यं देवो न जानाति कुतो मनुष्यः ।’ ”

“ माझ्या मुलांनीं पराक्रम करूं नये असं कुठं मी म्हणतोंय ? पण घरीं कोणत्याच गोष्टींची तिळभर वाण नसतां, आहे त्यांत संतुष्ट राहाण्याचं सोडून नाहीं त्याचा पाठलाग करणं मला गैर वाटतं. तशांत अलीकडे महाराष्ट्रभर मुसलमानांचा ‘ हैदोस–दुल्ला ’ चालू आहे. त्यांच्यांत माणुसकीचा कुठं मागमूसही आढळत नाहीं. पाहिली एकादी सुंदर पोर, कीं लागले तिच्या पाठीस नि ओढली तिला जनानखान्यांत ! बाटवा-बाटवीला तर हल्लीं भलताचं ऊत आला आहे. अशा स्थितींत तुम्हीच सांगा, मी काय बरं करावं ? ” बाबाजीनं सर्जेरावांस प्रश्न केला.

“ पोटचा गोळा नजरेआड होत असतां मायेचा कढ येणं स्वाभाविक आहे, पण ती माया कर्तव्याच्या आड येत असेल तर तिचे बंध तात्काळ तोडणं तितकंच शहाणपणाचं ठरत असतं. तुमचीं मुलं साहसी व धाडसी आहेत हें तुम्हांला दृष्टिआड करून चालणार नाहीं. क्षत्रियाच्या बच्चांनीं ‘ आत्म–धर्म ’ विसरून बापकमाईवर संतोष मानावा हें लांच्छन आहे. तुम्ही आपल्या दोघां मुलांना भरल्या अंतःकरणानं भावी आयुष्य कर्तब-गारीनं भरून काढण्यास परवानगी द्याल तर ‘ भोसलेकुल ’ गाजविल्या-शिवाय ते खास राहाणार नाहींत याची मला पक्की खात्री वाटते. ‘ मरणं प्रकृतिः शरीरिणाम् । ’ कुठंही असलं तरी तें थोडंच चुकणार आहे वा चुकवितां येणार आहे ? जीवन हा सुखानं भरलेला पेला नसून कर्तृत्वानं भरावयाचं माप आहे. तें रितं राहातां नये.” सर्जेरावांनीं ठासून सांगितलं.

वरील संवाद चालू असतां मालोजीच्या मनाची द्विधा स्थिति झाली होती. सर्जेरावांचं म्हणणं त्याच्या पथ्यावर पडलं. पण त्याबरोबर बापाच्या हळव्या मनाचीही त्याला कींव आली. त्याचं कोवळं—निर्विकल्प—

मन उद्विग्न झालं, हृदय भरून आलं व पुढील भाषण ऐकण्याचं सोडून तो तडक बाहेर निघून गेला.

संध्याकाळीं घरीं येऊन जेवणं आटोपल्यावर मालोजी कुठं तरी बाहेर गेला होता, तो मध्याह्नीं बाराचे सुमारास घरीं परतला. अंगणांत येशा नि हरबा त्याची वाट पहात विठोजीशीं बोलत बसले होते. मालोजी येतांच मोठ्या प्रसन्न मुद्रेनं त्यानं आपला निजामशाहींत शिलेदारी पत्करून राहाण्याचा निर्धार बोलून दाखविला; व त्यासाठींच आपण जेवण उरकून शेजारच्या गांवीं हणमंत्या पाटलाकडे फेरफटका करून आल्याचं सांगितलं.

" म्हणजे ! तूं पाटीलवाडीहून आतां जाऊन आलास ! कोणत्या पावलीं हें दहा मैलांचं अंतर तोडलंस बाबा ! " हरबानं आश्चर्यानं विचारलं.

" हरबा, येशा, कोणतीही गोष्ट एकदां मनानं घेतली, कीं ती करण्याचं वेड लागलं पाहिजे, म्हणजेच ती यशस्वी होते. माझं ध्येय मी निश्चित केल्यावर त्याला पोषक गोष्टी जमा करणं माझं कर्तव्य ठरतं. म्हणून पाटलांच्या कानावर माझा निर्धार घालण्यासाठीं व त्यांचा बहुमोल अनुभव ऐकण्यासाठीं त्यांची भेट घेऊन उभ्या पावलीं इथं आलों. वेळ थोडा नि तशांत अंधारी रात्र म्हणून वेळ न खर्चतां तुम्हांस आश्वासन दिल्याप्रमाणं हा इथं धांवत आलों.

" गड्यांनो ! उद्यां मी शिलेदार होणार ! येशा, म्हादबा—
शिलेदार होणार ! उद्यां मी शिलेदार होणार !
हातीं भाला, कमरे शेला, डोकिस मंदील,
गड्याच्या तिरकस मंदील ॥
तसाच बिचवा, खड्ग कटीला, अश्व वाहनाला । येशा ॥
तट्टु वाहनाला ॥
आणि मग—मला पाहुनी, नमतिल माना,
धाक पडे यवनांना । हृदयीं धाक पडे यवनांना ॥ "
" पुरे ! पुरे ! शिल्दार ! हा घ्या मित्रांचा जोहार । पहिला
मित्रांचा जोहार । "

घरीं आल्यावर मालोजी व विठोजी रात्रीं अंगणांत बराच वेळ आकाशींची दौलत पहात लोळत पडले होते. इतक्यांत येशा नि हरबा तिथं आले. त्यांनीं मालोजीची दुपारच्या वागणुकीबद्दल थट्टा आरंभिली. प्रथम कांहींएक न बोलतां बराच वेळ ऐकून घेतल्यावर त्यांच्यावर लटकेंच रागं भरल्याचा आविर्भाव आणून गंभीरतेच्या स्वरांत तो म्हणाला,

" गड्यांनो! साऱ्याच गोष्टी कांहीं थट्टेवारी न्यायच्या नसतात. दुपारच्या पाटलाच्या बोलण्यांत वावगं तें काय होतं? विचार करा. आपलीं हीं हत्तीसारखीं शरीरं घरच्या म्हातारीचा काळ बनण्यासाठींच का पोसलीं आहेत? मीं निश्चय केला आहे —"

" काय निश्चय केला आहेस? परवां वाघदरींत बोलून दाखविलास तो तर नव्हे?" हरबानं त्याचं बोलणं मधेंच थांबवून विचारलं.

भरवेगानं पळणारी मोटर अचानकपणं उद्‌भवणाऱ्या अडथळ्यामुळं ब्रेक लावून खाडकन् उभी करावी लागते, तद्वत् मालोजीच्या बोलण्याचा ओघ हरबाच्या प्रश्नानं एकदम थांबला; व तो शांतपणं त्यांनाच विचारूं लागला, " खरंच! मी कसला बरं निश्चय केला आहे? माहीत आहे तुम्हांला? वेड्यांनो! घाई नको. माझा निश्चय मी तुम्हांला दोन दिवसांनीं अगदीं ह्याच वेळीं ह्याच ठिकाणीं सांगेन. मला तो पक्का केला पाहिजे. महत्कार्यांचा निर्णय घ्यायला मध्यें चोवीस तास पाहिजेतच! आतां आपण आकाशांतील मौजा पाहूं या! तो बघ मृग. नि तो दक्षिणेकडं तेजानं झळाळणारा व्याध. कसा धनुष्य सज्ज करून मृगापाठीं लागला आहे! तो मृग त्याला मिळेल नि उत्तम शिकारी, अचूक नेमबाज म्हणून त्याचं नांव होईल. तुम्ही आम्ही जमिनीवरचीं माणसं माना उंचावून व डोळे ताणून त्याचं कौतुक करूं नि म्हणूं शाब्बास! खाशी मजा उडविली. शिकारीची लूट साधली."

मालोजीच्या गोष्टिवेल्हाळ मुखांतून बाहेर पडणारे शब्द कानांत सांठवून ठेवण्यांत त्या दुकलीला व विठोजीला किती रात्र उलटली हें कळलं देखील नाहीं. घरीं जातांना हरबा ' परवां ' घेतल्या जाणाऱ्या निर्णयाचे धागेदोरे विणण्याचा प्रयत्न करीत होता, तर येशा मालोजीच्या पत्रावळी-

" शिलेदारसाहेब ! खाशी मजा उडविलीत. आतां पुढं ? " इरबा-येशानं प्रश्न केला.

" पुढं ? उद्यांपासून मी तुमच्यांत नाहीं. चारदोन गांवं हिंडून माझ्या मताचे तरुण गांठून मला त्यांची फौज उभारायची आहे. परवां वाघदरींत मला तूं भेटलास तेव्हांपासूनच माझं मन बेचैन झालं, अन् गंमत ही, कीं त्या क्षणापासूनच माझ्या हेतूला साथ देणाऱ्या गोष्टी घडत गेल्या. आतां तुम्हांला जें काय बोलून घ्यायचं असेल तें आजच पुरं होऊं द्या ! " मालोजी उत्साहानं म्हणाला.

" म्हणजे ? तूं आम्हांला जनावरं समजलास कीं काय ? तूं निघालास तलवार गाजवायला, आणि आम्ही काय घरीं बसून भाकऱ्या भाजणार ? तूं तिथं आम्ही. बालपणापासून तुझी पाठ राखली ती मध्येंच सोडून द्यायला आम्ही थोडेच कृतघ्न आहोंत ? तूं आमचा पुढारी. अन् आम्ही तुझे शिपाई. तुझा पहिला हुकूम आम्हीं पाळायचा. हं ! कर आज्ञा. उद्यां कुठं कुठं नि काय काय करायचं तें ! " इरबा उद्गारला.

" शाब्बास ! वीर हो ! माझ्या संवगड्यांनो, तुम्ही माझे व मी तुमचा आहें. उद्यां काय करायचं तें उद्यांच ठरवूं ! आतां रात्र फार झाली आहे. जा. निवांत झोपा. कोणत्याही महत्त्वाच्या कामाला घाई वाईटच. दमानं जें घेतां येईल तेंच उत्तम वठतं, हा जगाचा अनुभव आहे. चला, मायमाउली कुलस्वामिनी आपली पाठराखीण आहे; तीच आपणांस योग्य मार्ग दाखवून यश देईल. तिच्यावरच सारा भरंवसा ठेवूं या." मालोजी उल्हसित वृत्तीनं बोलत होता.

★

## ४ कार्याला प्रारंभ

उजाडतं केव्हां नि आपण कार्यास सुरवात करतों केव्हां असं मालोजीस झालं होतं. विठोजी त्याचा पाठीराखा. तो कसा स्वस्थ बसणार ! त्यानंही भावाची कांस धरली. येशा व इरबा या दुकलीला मालोजीचा करारी स्वभाव व पराक्रम माहीत असल्यामुळं ते त्याच्या पूर्णपणं भजनीं लागले

क्र. ९०२

होते. त्याचे हुकूम अक्षरशः पाळणं व ते बजावणं यांतच स्वतःला ते धन्य मानीत. सारांश, या चौकडीनं आपल्या भावी जीवनाचा मार्ग पक्का करून प्रथम देवीच्या देवळांत 'तरुणांची' बैठक घेतली.

मालोजी ही प्रमुख व्यक्ति. तिच्या आवेशपूर्ण भाषणाचा रांगड्या मावळ—तरुण पोरांवर तात्काळ परिणाम होऊन तीं त्यांच्या नेतृत्वाखालीं येण्यास व पडेल तें काम करण्यास कबूल झालीं. हां हां म्हणतां पहिल्याच दिवशीं वेरूळ खेड्यांतील पंचवीस जवानमर्द मालोजीला येऊन मिळाले.

मालोजीनं आवेशानं जमलेल्या जवानभाईंना संघटनेचा उद्देश समजावून सांगितला. तो म्हणाला,

"गड्यांनो, सध्यां आपला धर्म धोक्यांत आहे. मुसलमानांच्या लाघवी बोलण्याचा आपल्या भोळ्याभाबड्या मनावर भलताच परिणाम होऊं लागला आहे. अन् आमिषाच्या लालचेनं गळाला मासा जसा अडकला जातो तद्वत् इस्लामियांच्या आहारीं आपण झपाट्यानं चाललों आहोंत. म्हणून आपल्या जातकुळीची आठवण करा. ती जागवा. क्षत्रियाला तिचा विसर पडणं अनर्थावह आहे. ही प्रथा बंद पडली पाहिजे. यासाठीं एकी पाहिजे. ती बलवत्तर पाहिजे. म्हणून प्रत्येकानं एकेक घोडं मिळवून व हत्यारं बाळगून वेळ येईल तेव्हां कुणाच्याही हांकेला धावून जाण्यास व आपला फायदा करून घेण्यास तयार रहा. दोघांच्या भांडणांत तिसऱ्या पक्षानं मध्यें पडून प्रबलपणें डोकं वर काढण्यास हीच संधि योग्य आहे. हिची जोपासना करा." वगैरे कितीतरी तत्कालीन परिस्थितीवर सांगोपांग विवेचन केलं. तसंच आपल्याला पटलेली गोष्ट शेजारीं खेडोपाडीं फिरून तेथील मर्दांच्या कानावर घालून हळूहळू एक मोठं सैन्य उभारण्याचा त्यांना कानमंत्रहि दिला.

सांठा असला म्हणजे तो केव्हां ना केव्हां उपयोगीं पडतोच. वेळ आली म्हणजे जमविलेलं सैन्य शत्रूच्या हृदयांत धाक उत्पन्न करण्यास पुरें पडतं. काळ आणि वेळ यांची सांगड घालण्याचं बिकट कार्य करण्यास मराठ्यांना शिकावयाचं होतं. मालोजी तें काम करण्यास समर्थ होता. त्याचसाठीं त्यानं शिलेदारी पत्करण्याचं ठरविलं होतं. जातांना

त्यानं आपल्या संवगड्यांना शरीरं कमावून बळकट एकी सांधण्याचा दिव्य संदेश दिला नि तोच त्यांच्या उपयोगीं पडला.

मालोजी निजामशाहींत येण्यापूर्वी जाधवांचं घराणं नांवरूपास चढलं होतं. या घराण्यांत मोठा कर्तबगार पुरुष लक्ष्मणसिंह होता. तोच लुकजी जाधवराव या नांवानं इतिहासांत प्रसिद्ध आहे. याला निजामानं दहा हजाराची मनसब देऊन एक बडा सरदार बनविलं होतं. मुसलमानी अमदानींत एवढ्या मोठ्या पदावर चढलेला हाच पहिला पुरुष असल्या-मुळं त्याच्या ठिकाणीं विलक्षण डौल येणं साहजिक होतं. रुंद चेहऱ्याची व भरघोस मिशांची जाधवरावांची करारी मुद्रा कोणालाही मान खालीं घालावयास लावील इतका त्या ठेंगू पुरुषाचा हाताखालील लोकांवर व जहागिरींतील रयतेवर विलक्षण वचक होता. मालोजी वेरुळास रामराम ठोकून निघाला तो इ. स. १५७७ त लुकजी जाधवांचे वतीनें शिलेदारी करूं लागला. या वेळीं तो सत्तावीस वर्षांचा होता.

आपल्या मुलाची शिलेदारी चांगली चालली आहे, त्याच्या मोठमोठ्या सरदारांशीं ओळखी गांठी होत आहेत हें ऐकून म्हाताऱ्या बाबाजीला बरं वाटे. त्याच्या आनंदाला अस्मान ठेंगणं होई. अधून मधून त्याचे संवगडी निजामशाहींत जाऊन त्याला भेटत व कोणत्या ना कोणत्या लढ्यांत मालोजीच्या आज्ञेनं भाग घेऊन लुटीचा फायदा पदरांत टाकीत. असं सतत पंधरा वर्षं चाललं.

मध्यंतरीं फलटणच्या वणगोजी निंबाळकर नायकानं आपली बहीण दीपाबाई मालोजीस दिली. लग्न मोठ्या थाटांत झालं. वणगोजी शूर, करडा व फौजबंद होता. त्यानं आपल्या बहिणीला स्वतःच्या पसंतीनंच मालोजी नवरा निवडला होता. गुणाचा मोठा पारखी असल्यामुळं मालोजीच्या आंगचे गुण त्यानं अगोदरच हेरले होते. आपल्या मुलाला अनुरूप पत्नी मिळून स्वतःस घराण्याजोगी सून लाभली याबद्दल बाबा-जीला फार समाधान वाटलं. असे पुष्कळ दिवस गेले. सोळा वर्षं झालीं लग्नाला, तरी त्या जोडप्याला मूलबाळ नव्हतं.

3930

दीपाबाई बोलून चालून कोमल मनाची स्त्री. आपल्याला मूल नाहीं याचं तिला नेहमीं वैषम्य वाटे. मूल हा स्त्रीजातीचा ठेवा. त्याच्या संगतींत तिला अभिमान वाटतो. मातृत्वानेंच स्त्रीजीवनाला पूर्णत्व येतं. कुबेराची संपत्ति बालक नसेल तर कवडीसमान वाटते. मुलं घरांतील जणूं फुलंच. एकानं बाग फुलवावी तर दुसऱ्यानं घर शोभवावं. आकाशींचीं फुलं घरेवरील मुलांहून अधिक नाहींत हा मातांचा अभिमान दीपाबाईचं हृदय विदारण करीत होता. छोटीं मुलं आपल्या आयांबरोबर बागडतांना पाहून तिच्या हळव्या मनाला तर विशेष दुःख जाणवे. तिनं पुष्कळ नवससायास केले, पण व्यर्थ. मालोजीचा जो काळ स्वारीशिकारीवर जाई तेवढ्या अवधींत तो सुखांत असे; पण घरीं पाऊल ठेवतांच आपल्याला कसलीतरी उणीव आहे याचा भास झाल्याशिवाय राहात नसे. मग मात्र तीं उभयतां खिन्न होत. घर म्हणजे त्यांना अवाढव्य सहारा वाटे. संसाराच्या असारतेविषयीं कविवर्गांनीं वर्णिलेले अंदाज त्यांना खरे वाटूं लागले.

शेवटीं नगरच्या किल्ल्यांत शहाशरीफ पीर नांवाचं मोठं जागृत स्थान आहे, त्याची एकनिष्ठभावानं उपासना केल्यास तो पावतो अशी दीपाबाईला कोणीतरी बातमी सांगितली. तिचा सुकलेला चेहरा तरारला. चांगलाच टवटवीत दिसूं लागला. श्रम करण्यास ती नाखूष नव्हती. पण यशाचाच पत्ता नसल्यामुळं तिची अशी दीनावस्था झाली होती.

तिनं त्या पिराला नवस केला व कांहीं दिवस नगरासही जाऊन ती राहिली. तिथं नेमधर्मानं उपासतापास व दानधर्म करून ती सिंदखेडास परतली. पुढं तिला रत्नासारखे दोन सुंदर मुलगे झाले. हें त्या पिराच्या कृपेचं फळ होय असं समजून मालोजीनं त्यांचीं नांवं शहाजी व शरीफजी अशीं ठेविलीं. सिंहजित् व शरभजित् या संस्कृत नांवावरूनच तीं ठेविलीं असावीं असं इतिहासज्ञांचं म्हणणं आहे. कसंही असो. मालोजीचं घर शांगत्या मुलांनीं शोभायमान झालं आणि दीपाबाईचा संसार प्रफुल्लित झाला हें त्या पिराच्या सेवेचंच फळ होय यांत मुळींच दुमत नाहीं.

★

# ५ संसार असार नाहीं.

देवाच्या दुनियेंत सुखाच्या कित्येकपट जास्त दुःखं भरलेलीं आहेत. त्यामुळंच माणसाच्या वांट्याला सुखापेक्षां दुःखाचं प्रमाण जास्त येत असतं. सुखदुःख जुळीं भावंडं. मानवी जीवनांत आरंभापासून अखेर-पर्यंत तीं लपंडाव खेळत असतात; व त्याला कधीं रंजवितात तर कधीं रडवितात. ऊन-सावलींत जशी एकच स्थिति लाभणं दुर्मिळ जातं, तीच गत सुखदुःखाच्या बाबतींत घडते. माणसाला वाटतं आपणाला सुख मिळावं, आमरणान्त सुख मिळावं. पण लपंडाव खेळणाऱ्या या जुळ्या भावंडांपैकीं आळीपाळीनं जीत येणाऱ्या दुःखाचं स्वागत करायला मनुष्य-प्राण्यानं कंटाळावं हा त्याचा दुष्टपणा नव्हे काय !

दीपाबाईच्या अमोल भक्तीचं बक्षीस पुत्ररत्नानं लाभल्या दिवसापासून तिच्या संसाराचा बाग सदा फुललेला असे. दुःखाअंतींच सुख जास्त शोभून दिसतं हेंच खरं.

शहाजी तिचा थोरला मुलगा. गोरापान, मध्यम बांध्याचा, सुदृढ व देखणा होता. त्याचं मधुर बोलणं ऐकणाराचं मन तेव्हांच आकर्षून घेई. हसतांना गालांना पडणारी खोल खळी पाहून मोठेपणीं कोणतं तरी महान् राजकारण खेळविणारी ही खास चतुर व्यक्ति होणार असा कित्येकांनीं अंदाजही बांधून ठेविला होता.

शरीफजी शहाजीच्या मानानं कमी तरतरीत. तरीपण थोरल्या भावाचं अनुकरण करून त्याला साथ देण्यांत किंवा त्याची पाठ राख-ण्यांत कधींच कमतरता पडूं देत नव्हता. उभय मुलांच्या बाललीलांनीं दीपाबाईला आनंद तर होईच, आणि त्यांच्या कृतीबद्दल तिला धन्यताही वाटे.

मालोजी शिलेदार. लुकजी जाधवरावांचा ताबेदार. जवळ जवळ तो त्यांचा नोकरच. असं असूनही आपल्या मुलांना त्यानं गरिबीची जाणीव कधींच होऊं दिली नाहीं. सरदारांच्या मुलाला शोभेल असा रुबाब तो त्यांचा ठेवी. यामुळं त्याच्या बरोबरीच्या शिलेदारांना त्याचा हेवा वाटे.

शहाजीच्या मधुर भाषणानं मालोजी मोहून जाई, व तो त्याला अभिमानानं वारंवार आपल्याबरोबर दरबारांत घेऊन जाई. यामुळं लहानमोठ्या सरदार-दरकदारांच्या नजरेस तो पडे. आपल्या बोलक्या, धीट व चौकस स्वभावामुळं प्रत्येक सरदाराला त्याचा रुबाबदार चेहरा मोहून टाकी व तो त्यांना हवासा होई. आपल्या मुलाचं घरींदारीं सर्वत्र होणारं कोडकौतुक पाहून उभयतां मातापितरांना स्वर्गसुखही तुच्छ वाटे.

लुकजी जाधवराव मुलांचे फार शोकी. शहाजीला ते वारंवार आपल्या घरीं बोलावीत व त्याचे फार लाड करीत. त्याच्या बाललीला त्यांना इतक्या आवडत कीं तासन् तास काम बाजूला सारून कधीं कधीं ते त्याच्याशीं खेळ खेळण्यांत गर्क होत. त्यांची छोटी जिजा शहाजीप्रमाणंच रुबाबदार, चौकस नि सुंदर होती. शहाजीची व तिची समान स्वभावधर्मानुरूप तेव्हांच गट्टी जमे; यामुळं कधीं कधीं खेळ खेळण्यांत तीं इतकीं गर्क होत, कीं त्यांना भूकतहानही लागत नसे.

बरोबरीचीं मुलं जमवून त्यांच्याशीं कुस्ती, लुटुपुटुची लढाई, वगैरे मर्दुमकीचे खेळ खेळतांना शहाजीला पाहिलं म्हणजे मोठेपणीं तो कोण होणार याची कोणालाही अचूक कल्पना करतां आली असती. आणि इतिहास तरी दुसरं काय सांगतो ! 'मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात' हेंच खरं !

जिजाची आई म्हाळसा मोठी कुर्रेबाज स्त्री होती. आपल्या सरदारकीच्या तोऱ्यांत ती सदा गुंग असे. इतरांना कांहीं मानापमान आहे याची तिला क्वचित्च कल्पना असे. यामुळं आपल्या पतीकडून शहाजीचं होणारं कौतुक तिला मनापासून आवडत नसे. शिलेदाराचा मुलगा रूपगुणसंपन्न असला तरी तो सरदाराच्या मुलाची बरोबरी कशी करूं शकतो ! हा तिचा प्रामाणिक आरोप होता. तिचं मानी मन म्हणे, "ज्यानं त्यानं आपापल्या योग्यतेनुरूप वागावं. पायरी सोडूं नये. कांहींही केलं तरी शामभट्टाच्या तट्टाणीला इंद्राच्या ऐरावताची थोडीच सर येणार ?" मत्सरी स्त्रीचीं दुसऱ्याबद्दलचीं मतं अशीं असावीं यांत नवल कसलं !

मोठेपणा पिढीजाद चालत येत नसतो. तो कर्तबगारीवर अवलंबून असतो हें गर्विष्ठ म्हाळसाबाईला माहीत नव्हतं. तिची कल्पना बायकी होती. तींत पोक्तपणा नव्हता. मानी मनुष्य—कर्तबगार व्यक्ति—जगाच्या उलाढालींत आपल्या बहुमोल प्राणाची कुर्बानी करून आपली करणी जनताजनार्दनासमोर उभी करतो आणि मग जग त्याचीं कृत्यं न्याहाळून सन्मानपूर्वक त्याची पूजा बांधतं. अशा रीतीनं मोठेपणा प्राप्त होत असतो. मोठेपणाची नसती घमेंड मनगटांत जोर असलेली कर्तृत्ववान् व्यक्तीच उतरीत असते.

शहाजी मालोजीचा ठेवा होता. खंबीर मनाच्या मराठ्याचा तो जाज्वल्य अभिमान होता. त्याला मोठेपणाच्या बागुलबुवाची कधींच भीति वाटली नव्हती. मोठेपण त्याच्या कुणी पदरांत बांधणार नव्हतें. तें तो मिळविणार होता. नव्हे तें आपोआप त्याच्याकडं येणार होतं. म्हणूनच भावी काळचं भविष्य अगोदरच हेरून त्यानं आपल्या मुलास बालपणापासूनच मोठेपणांत—नबाबींत—वाढविलं होतं.

★

## ६ मर्दमराठ्याची प्रतिज्ञा

सन १५९९ मधील फाल्गुन महिना. जिकडं तिकडं महाराष्ट्रांत रंगपंचमीच्या सणाचा धुमधडाका चालू होता. लुकजी जाधवराव निजामशाहींतील मातबर सरदार. त्यांच्या हाताखालीं कित्येक सरदार, दरकदार, शिलेदार, बारगीर, भालदार, चोपदार वगैरे आश्रित मंडळी होती. तीं सर्व आपापल्या लव्याजम्यानिशीं सिंदखेडास जाधवरावांच्या निमंत्रणावरून रंगपंचमीचा सण साजरा करण्यासाठीं जमली होती.

मालोजी त्यांच्याच हाताखालचा शिलेदार. त्याला खास आमंत्रण होतं. नेहमींप्रमाणं आपल्या पांच वर्षांच्या छोट्या शहाजीस डौलदार सरदारी पोषाकांत सजवून त्यानं त्याला आपल्याबरोबर घेतलं होतं.

निजामशाहींत जाधवरावांना पहिल्या प्रतीचा मान असे. यामुळं एकाद्या स्वतंत्र राजाप्रमाणं त्यांचा डौल असणं अस्वाभाविक नव्हतं.

' रंगमहालाचा ' दिवाणखाना लतापल्लवांनीं व हंड्याझुंबरांनीं शृंगारून मधून मधून रंगीबेरंगी झालरीही सोडिल्या होत्या. सभोंवार हजारों पणत्या मांडून रात्रीच्या रोशनाईची उत्तम व्यवस्था केली होती. अशा तऱ्हेनं सजावटीचं उत्तम काम करून आंत बसण्यासाठीं नमुनेदार आंखणी केली होती. दिवाणखान्याच्या मध्यभागीं पूर्वाभिमुख भिंतीला लागून एक उच्चासन सजविलं होतं. तें जाधवरावांसाठीं होतं. त्याच्या दोन्ही बाजूंस लहानमोठ्या मानाच्या मानकऱ्यांना बसण्यासाठीं पांढऱ्या शुभ्र स्वच्छ चादरींनीं आच्छादलेले लोड, तक्के मांडले होते. समोर औरस चौरस जाजम अंथरलं होतं, त्यावर इतर नोकरवर्ग बसणार होता.

सर्व मंडळी आपापल्या योग्यतेनुरूप स्थानापन्न झाल्यावर जाधवराव तारामंडळांतील चंद्रम्याप्रमाणं शोभून दिसत होते. तो देखावा अपूर्व होता. लहानथोर सर्वांचीं मुखं अभूतपूर्व उत्साहानं उल्हसित झालीं होतीं.

मालोजी आपल्या दर्जानुरूप दूर बसला होता. पण त्याचा चळवळ्या पुत्र शहाजी बापाजवळ नव्हता. सर्वांनाच तो आवडत असल्यामुळं विशेषतः जाधवरावांना तो प्रिय झाल्यापासून त्यांच्याशिवाय इतरांजवळ तो क्वचितच असे.

लहानाला काय ! जो त्याला प्रेमानं जवळ करील, त्याला चांगला म्हणेल, लडिवाळपणं वागवील व खाऊ देईल तोच त्याच्या दृष्टीनं भला ! शहाजीला जाधवरावांचा फारच लळा ! म्हणून तो त्यांच्याजवळ त्यांच्याच रुबाबांत ऐटींत बसला होता.

समारंभाला सुरवात झाली. जाधवरावांनीं जमलेल्या सर्व मंडळीस रंगपंचमीच्या सणाचं महत्त्व सांगण्यास सुरवात केली, तोंच त्यांची तीन वर्षांची गोरीपान लाडकी जिजा घरांतून धूम बाहेर धांवत आली व बापाच्या मांडीवर बसून समोर मांडलेल्या वस्तूंची उडवाउडवी करूं लागली.

शहाजी तिच्याच वयाचा खेळकर मुलगा. तोही तिचं अनुकरण करूं लागला. हां हां म्हणतां सर्वांचंच लक्ष त्यांच्याकडं वेधलं. जाधवरावांनीं दोघांना आपल्याजवळ ओढून घेतलं नि सहज ममतेनं म्हटलं, "हणमंतराव, छान दिसतो नाहीं जिजा-शहाचा जोडा ! "

"वा! वा!! छान म्हणून काय म्हणतां! फारच सुंदर दिसतो बघा!" जवळच हुक्का ओढीत बसलेल्या म्हाताऱ्या हणमंत्या सरदारानं जाधवरावांना दुजोरा देत म्हटलं.

"आवडतो का ग तुला हा नवरा?" जाधवरावांच्या तोंडून शब्द निघण्याचा अवकाश तोंच—

"माजा नवला! माजा नवला!" असं म्हणून जिजानं शहाजीवर गुलाल उधळण्यास सुरवात केली. मग काय! शहाजी थोडाच गप्प बसतो! त्यानंही तिच्यावर गुलालाची मूठ फेकली.

बराच वेळ या प्रकारानं सर्वांना मोठं कौतुक वाटलं. त्या भरांत दूर कोंपऱ्यांत बसलेला मालोजी ताडकन् उठून एकदम गरजला, "लोकहो! ऐकलंत जाधवराव आतां काय म्हणाले ते? शहाजीला त्यांनीं आपला जांवई केलं. आजपासून ते आमचे व्याही झाले."

"शरम वाटली पाहिजे हे शब्द उच्चारायला! सरदाराची मुलगी त्याच्याच हाताखालच्या शिलेदाराची सून कधीं झालीय?"

मालोजीला जाधवरावांच्या मग्रूरीच्या धमकावणीचा मनस्वी संताप आला. तो ताडकन् उठला व दिवाणखान्यांतून झपाझप पावलं टाकून बाहेर पडला. तेजस्वी बाणेदारपणाचं लक्षण असंच असतं.

पुढं थोडयाच दिवसांनीं मोठ्या थाटानं पोस्ताचं जेवण करण्याचं जाधवरावांनीं नक्की केलं; व सर्वांबरोबर मालोजीला स्वतः निमंत्रण दिलं. पण मानी मराठा अपमानानं डिवचला गेल्यामुळं त्यानं जाधवरावांचा मुलाहिजा न ठेवतां ठणठणीत बजावलं,

"आतां लग्नांतच तुमचं आमचं जेवण होईल, मधीं व्हायचं नाहीं." मालोजीच्या निग्रही उद्गारानं जाधवराव मनांत चपापला व रंगाच्या भरांत आपण भलतंच बोलून गेलों याचा त्याला पश्चात्ताप झाला.

जाधवरावांची पत्नी म्हाळसा हिच्या कानावर दरबारांतील गोष्ट गेली तेव्हां तिनं आकाशपाताळ एक करून सोडलं. आपल्या तोऱ्यांत तिनं मालोजीची यथेच्छ निंदा करून म्हटलं,

" हुजऱ्या तो हुजऱ्या! नि तो म्हणे मजवर ढाळा चवऱ्या!"

सरदारीणबाईंचा तोल सांभाळण्यास जमलेल्या इतर 'साळकायांनीं' तिच्या म्हणण्याला पुस्ती जोडून आपलीं तोंड रंगवून घेतलीं. बराच हंशा पिकला. जातांना म्हणत गेल्या सुद्धां " शिलेदाराचा पोर, गोरागोमटा असला म्हणून थोडाच होणार थोर?"

जाधवरावांची म्हाळसाबाईनं कानउघाडणी केली हें निराळं सांगणं नकोच! ती म्हणाली, " शिर्के, निंबाळकर, महाडीक, पवार एकापेक्षां एक पातशाहींत धुरंधर सरदार असतां त्यांच्याकडं पाठ फिरवून त्या शिपुरड्या भोसल्याला व्याही करतां? का ते सारे वांझ आहेत? तें कांहीं नाहीं. भोसले-जाधव सोयरिकीच्या नात्यानं कधींच एक होणार नाहींत हें त्याला स्पष्ट बजावा!"

पत्नीचं बोलणं जाधवरावांना पटलं व तसं त्यांनीं मालोजीला बोलावून कळविलं. पण—

" मराठा वचनाचा सच्चा असतो. कच्च्या दिलाच्या माणसाला आपले हे बोल ऐकवा. सरदारसाहेब! करीन तर तुमचीच मुलगी सून करीन हें पक्कं समजा. कोणताच बाका प्रसंग मर्दाचा बोल फुका करण्यास समर्थ नसतो हें मी तुम्हांला पटवून देईन." त्वेषानं मालोजी कडाडला व शेवटचा मुजरा ठोकून त्यानं सिंदखेडास रामराम ठोकला.

★

## ७ इच्छा असली म्हणजे मार्ग सांपडतो.

पराक्रमाला जग मोकळं असतं. मालोजी सिंदखेडाहून निघाला तो तडक वेरुळास येऊन ठेपला. त्याच्या येण्यानं अर्थातच त्याच्या मित्रांना फार आश्चर्य वाटलं. सरदारकी मिळविण्यास गेला काय नि आपल्या वरिष्ठाशीं भांडून हात हालवीत परत आला काय! सर्वच जगावेगळं त्यांना दिसलं. त्यांनीं त्याला नाना प्रकारें हिणवण्यास सुरवात केली. पण

उलट त्यांच्यावर न रागावतां त्यांतून मार्ग निघेपर्यंत तो तोंडांत पाणी धरून होता. कृतीनंच त्याला आपलं कर्तृत्व त्यांच्यापुढं उभं करायचं होतं. चार आठ दिवस तो कुणाजवळ विशेष कांहीं बोलला नाहीं, कीं धड जेवला नाहीं.

पंधरवड्यानंतर एके रात्रीं जेवणखाण आटोपून तो आपल्या भवितव्याचा विचार करीत अंथरुणावर पडला असतां थोड्या वेळांत गाढ झोंपीं गेला. बाराच्या सुमारास त्याला जाग आली, तोंच त्याच्या डोळ्यासमोर कसला तरी लख्ख प्रकाश दिसला. त्याला त्याचा कांहींच अर्थ कळेना. कांहींशा गोंधळलेल्या मनःस्थितींत त्यानं इकडे तिकडे नजर फेंकली नि पुन्हां अंथरुणावर आडवा झाला.

मोठ्या पहांटेस पहिल्या कोंबड्याच्या सुमारास त्याला एक स्वप्न पडलं. स्वप्नांत त्याला एक तेजःपुंज देवी दिसली. तें दिव्य रूप पहातांच आपोआप त्याचे हात जुळले. भक्तिभावानं त्यानं आपलं शिर नमविलं, तोंच ती बोलूं लागली,

" मानी पुरुषा, ऊठ ! चांगले डोळे उघडून पहा ! आश्चर्यचकित होऊं नकोस ! मला तूं ओळखलंस ? नीट बघ. मी तुझी कुलस्वामिनी आहें. तुझा बाणेदारपणा पाहून मी तुझ्यावर अत्यंत प्रसन्न झालें आहें. तुझ्या कुळांत लौकरच एक शककर्ता पुरुष जन्मास येणार असून तो देशाला दुष्ट सत्तेपासून मोकळं करील व दिगंत कीर्ति मिळवील. म्हणून ऊठ. झटपट कामाला लाग. निराश होऊं नकोस. " इतकं बोलून देवी गुप्त झाली.

देवीचं प्रगट होणं नि अंतर्धान पावणं या गोष्टी इतक्या झटपट झाल्या, कीं मालोजीचा स्वतःच्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. ' मनांत घोळणाऱ्या विचारांचा भास तर तो नव्हता ! ' ही अस्पष्ट शंका त्याच्या मनांत चटकन् डोकावलीसुद्धां. त्याच्या आंगाला दरदरून घाम सुटला, नि किंचित् भ्यालाहि तो. पण धीर न सोडतां विचार करूं लागला, तोंच पहिल्या कोंबड्यानं 'साद' दिली. आपल्याला हा शुभ शकूनच झाला

९१२

त्याची त्याला खात्री पटली. कारण पहांटे पडलेलीं स्वप्नं किंवा दिसलेले साक्षात्कार खरे ठरत असतात असं त्यानं कित्येकांच्या तोंडून ऐकलं होतं. मघांचा चमत्कार 'भास' नसून आदिमाता आदिशक्ति कुलस्वामिनीनं आशीर्वाद दिला याबद्दल आतां संशय उरला नव्हता त्याला.

कोणाची कांहीं वस्तु हरवली कीं तो जसा कावराबावरा होऊन इकडं तिकडं शोधक दृष्टीनं पाहात असतो, त्याप्रमाणं मालोजीची वृत्ति त्या दिवसापासून चमत्कारिक होऊन गेली.

पुढं कांहीं दिवसांनीं एका चांदण्या रात्रीं मालोजी व विठोजी आपलं शेत राखण्यासाठीं बैलगाडी जुंपून शेतावर गेले. मध्यरात्रीपर्यंत त्या दोघां भावांच्या भावी उलाढालीच्या कितीतरी गोष्टी चालल्या होत्या. शेवटीं मध्याह्न उलटली. विठोजी पेंगूं लागला व थोड्याच वेळांत घोरूंही लागला. मालोजीला जाधवरावांच्या शब्दांची चुटपूट लागून राहिली होतीच. त्याचा कांहीं डोळा लागेना. डोळे ताठरले. म्हणून हातांत कुदळ घेऊन तो उठला व शेताचा पडका कोपरा उगाच खणूं लागला. कांहींसं खणल्यावर त्याची कुदळ कसल्यातरी भांड्यावर लागल्याचा आवाज त्याला ऐकूं आला. त्यामुळं त्याची जिज्ञासा वाढली व खणलेली माती त्यानं फावड्यानं उकरली. तों चंद्रप्रकाशांत तांब्याचं भांडं चकाकतांना त्याला दिसलं. तो हंडा होता. त्यानं तो बाहेर काढला. तों दुसरा दिसला. असे सात हंडे त्यानं बाहेर काढले. ते सर्व सोन्याच्या मोहरांनीं गच्च भरलेले होते. त्याचा आनंद गगनांत मावेना. त्यानं एक उडी मारली व धांवत जाऊन भावास उठविलं. विठोजी तें पाहातांच 'आ' वासून तिथंच बसला. त्यांनीं देवीस दंडवत घातला व आपलं भाग्य उजळल्याबद्दल तिला धन्यवाद दिले.

नंतर रवंथ करून शांतपणं जमिनीवर माना टाकलेल्या बैलांस विठोजीनं उठविलं नि झटपट त्यांना गाडीला जुंपलं, सर्व हंडे तींत भरले, व कोणीं पाहूं नये म्हणून वर गवत पसरून मोठ्या पहांटे घर गांठलं.

मालोजीजवळ अगणित संपत्ति झाली. तेवढ्या संपत्तीनं त्याला आपलं

आयुष्य सुखांत घालवितां आलं असतं. पण श्रीमंतीच्या डौलांत त्याला जीवन जगायचं नव्हतं. त्यासाठीं त्याचा जन्मच नव्हता मुळीं.

या जगांत स्वार्थी लोकांना मान नाहीं. जो दुसऱ्यासाठीं अहर्निश झटतो, परोपकारार्थ तन–मन–धन खर्च करतो त्याचीच वाहवा होते, त्यालाच जग मान देतं व पुढं आणतं, हा नित्याचा अनुभव आहे.

हातांत द्रव्य पडतांच मालोजी तडक श्रीगोंदें गांवीं गेला. तिथं शेषाप्पा नाईक पुंडे नांवाचा एक भला गृहस्थ त्याचा मित्र होता. त्याच्या साहाय्यानं त्यानं एक हजार घोडीं विकत घेऊन आपली पागा वाढविली व एक हजार स्वार तयार केले. मर्द जवानांचा एवढा कणखर मेळावा पाहतांच मालोजीचा लोकांना मोठा दरारा वाटूं लागला.

श्रीशिखर महादेव शिंगणापूर महाराष्ट्रांतील प्रसिद्ध क्षेत्र. दरवर्षी या ठिकाणीं चैत्रांत मोठी यात्रा भरत असते. देशाच्या कानाकोंपऱ्यांतून भाविकांची रीघ लागलेली पाहिली, कीं मन भक्तिभावानं उचंबळून जातं. अशा या पवित्र ठिकाणीं सर्व गोष्टींची अनुकूलता होती; पण पाण्याच्या भयंकर टंचाईमुळं गोरगरीब तहानेनं तडफडायचे, तर कित्येकांना मूर्च्छा देखील यायची; आणि वारकऱ्यांना स्नानाविना देवदर्शन घ्यावं लागायचं. हें सर्व पूर्वापार चालत असूनही त्यांतून मार्ग काढण्यास कोणासही बुद्धि किंवा ताकद झाली नव्हती. बिचाऱ्या लेकुरवाळ्या बाया व म्हातारेकोतारे उत्सवाचा दिवस जवळ आला म्हणजे उद्विग्न होत व दुरूनच नमस्कारावर आपली यात्रा भागवीत.

ह्या दुःखद स्थितीनं मालोजीला भडभडून येई. पण करतो काय एकटा ? आटोक्याबाहेरची गोष्ट होती त्याच्या ती. इच्छा खूप होती पण मार्ग नव्हता सांपडला त्याला. तो अचानक सांपडलेल्या द्रव्यानं पार पडला. जीवनाला जीवन देण्याचा त्याचा कृतसंकल्प फळास आला.

त्यानं पंचक्रोशींतील गांवकऱ्यांना पाचारण केलं, आपला मनोदय त्यांना कळविला व त्यांच्या साहाय्यानं एक मोठा सुंदर विस्तीर्ण तलाव बांधिला. त्यांत पाणी विपुल राहूं लागलं. यात्रेकरू सुखावले. त्यांची गैरसोय दूर झाली.

त्याचप्रमाणं निरनिराळ्या क्षेत्रीं कुठं धर्मशाळा बांध, अन्नछत्रं सदावर्तं चाल, विहिरी खण, रस्ते बांध अशीं सार्वजनिक उपयुक्ततेचीं कामं करण्याचा त्यानं सपाटा सुरू केला. याचा परिणाम असा झाला, कीं प्रत्येकाच्या तोंडीं त्याचं नांव झालं व त्याच्या परोपकारबुद्धीचं सर्वत्र गुणगान होऊं लागलं.

मालोजीला तेंच पाहिजे होतं. जगांत नांवरूपास यायला परोपकारबुद्धीचं अधिष्ठान असावं लागतं.

घृष्णेश्वर बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक प्रसिद्ध क्षेत्र. तिथं जमिनींत खोल शंकराची भव्य पिंडी आहे. वेरूळच्या परिसरांतील तें स्वयंभू मंदिर-ठिकाण—मोडकळीस आलं होतं. त्याचा त्यानं जीर्णोद्धार केला. शिवाय जवळ शिवालयतीर्थ बांधिलं. तसंच यात्रेच्या वेळीं जातीनं हजर राहून त्यानं पुष्कळ दानधर्म केला. लोक त्याला आतां थोर मानूं लागले. त्याला सरदार मालोजीराव म्हणूं लागले. चारचौघांत त्याची वाहवा करूं लागले.

ज्या अनुकूल संधीची मालोजी आजवर वाट पहात होता ती आतां आयतीच त्याला चालून आली होती. 'तवा तापला असतांच चांगल्या पोळ्या भाजल्या जातात.' लोकांची सहानुभूति आपल्याकडे वळलेली पाहतांच जाधवरावांनीं बायकोच्या लहरीखातर आपले शब्द कसे मागं घेतले हें त्यांना त्वेषानं सांगितलं. त्याबरोबर लोकांच्या मनांत जाधवरावांबद्दल अप्रीति उत्पन्न झाली. अशा रीतीनं भोंवतालचं लोकमत अनुकूल करून घेतल्यावर तो आपल्या मेव्हण्याकडे गेला.

'राव वणंगपाळ बारा वजीरांचा काळ' असा वणगोजी नाईक ऊर्फ जगपाळराव निंबाळकराचा सर्वत्र दरारा होता. तो म्हणजे निधड्या छातीचा साहसी वीर. कुठंही लढाईची भेरी दुमदुमली, कीं त्यानं तिथं उडी घेतलीच. यामुळं मुसलमान राजांना त्याचा मोठा वचक होता. मालोजीनं आपली हकीकत त्याला निवेदन करतांच सिंहासारखी गर्जना ठोकून त्यानं जाधवरावांना आव्हान देऊन म्हटलं,

" कांहीं हरकत नाहीं ! जाधवराव स्वतः मनसबदारीच्या तोऱ्यावर झुलत असतील तर इतर मराठा कुळं कांहीं त्यांचं दास्यत्व पत्करण्यास जन्मलीं नाहींत म्हणावं ! त्यांनाही स्वकुळीचा अभिमान आहेच. मालोजी, शहाजीचं लग्न जिजीशींच झालं पाहिजे. माझ्या बारा हजार फौजेपैकीं तुला हवं तेवढं सैन्य घे नि पराक्रम करून शहाला धाक बसेल असं कांहीं कर ! "

मालोजीला सरदारांच्या प्रोत्साहनानं धीर आला. त्यानं त्यांच्याकडून दोन हजार फौज घेतली व स्वतःजवळची एक हजार मिळून तीन हजार फौजेच्या बळावर त्यानं जाधवरावांच्या जहागिरीला उपद्रव देण्याचा सपाटा सुरू केला. मधून मधून तो निजामशहाचीही कळ काढण्यास चुकला नाहीं. इतकंही करून उपयोग होईना, म्हणून त्यानं निराळीच युक्ति योजिली. ती अशी—

जगपाळरावाच्या मदतीनं त्यानं कांहीं रानडुकरं मारून त्यांच्या गळ्यांत चिठ्या अडकविल्या व तीं दौलताबादेंतील चार दोन मशिदींपुढं रात्रीं नेऊन टाकिलीं. चिठींत त्यानं लिहिलं होतं, " बाईल माणसांच्या नादानं, जाधवरावांनीं कबूल केलेली सोयरिक मोडली व आम्हांस कामावरून दूर केलं. म्हणून या बाबतींत तुम्ही रदबदली करीपर्यंत असाच क्रम चालू राहणार ! "

दुसऱ्या दिवशीं मुसलमानांना माशिदीपुढं डुकरं मरून पडलेलीं दिसलीं. मुसलमानी धर्मांत डुकर अमंगल मानतात, यामुळं त्यांना त्या गोष्टीची फार चीड आली. त्यांनीं रागारागानं शहाच्या कानावर ती गोष्ट घातली.

मशिदींतील भ्रष्टाकाराची बातमी शहाच्या कानीं जातांच तो फार खवळला. यावेळीं तो आपल्या वजिराजवळ महत्त्वाचीं खलबतें करण्यांत गुंतला होता; तीं अर्धवट सोडून बाबाजीच्या पोरट्याचा ताबडतोब बंदोबस्त करण्यास त्यानं वजिरास हुकूम फर्माविला.

दिल्लीची मोंगली सलतनत अखिल हिंदुस्तानभर सार्वभौम सत्ता स्थापण्याच्या विचारांत होती. तिला दक्षिणेंतील मुसलमानी राज्यें आपल्या पंजाखालीं आणावयाचीं असल्यामुळं प्रथम निजामशाहीवर तिची धडक

पडणार होती, त्यांतच मालोजीचा धुमाकूळ. यामुळं काय करावं याचा वजिरापुढं पेंच पडला. त्यानं थोडा वेळ परिस्थितीचा सूक्ष्म विचार केला व शहाला म्हटलं,—"मालोजी कसा झाला तरी आपला शेजारी. त्याचं म्हणणं ऐकून घेतल्याशिवाय एकदम कांहींतरी निर्णय घेणं बरं नाहीं. जर का तो बिथरून मोंगळांस मिळाला तर आपला काटा काढण्यास मोंगलास वेळ लागणार नाहीं. म्हणून शूरांची पूजा शूरत्वानंच बांधिली पाहिजे. यांतच खरी मुत्सद्देगिरी. आपण त्याला जवळ करूं या! म्हणजे पहा केवढा फायदा होतो तो!" वगैरे सर्व व्यूह त्याला समजावून दिला.

वजिराचा पोक्त विचार शहास पटला; व मालोजीच्या असंतोषाचं कारण निपटून काढण्याचा विचार करून त्यास दरबारांत बोलावणं पाठविलं.

याच सुमारास वणगोजी निंबाळकरानं विजापूरच्या मुलखांत कऱ्हाड, कोल्हापूरपर्यंत घुसून धुमाकूळ घातला. हें ऐकून निजामशहाला बरं वाटलं. आपल्या शत्रूला परभारें मिळणारा मार पाहून कुणाला बरें बरं वाटणार नाहीं! या आगळिकीनं आदिलशहा बिथरला. त्यानं वणगोजीच्या समाचारासाठीं मोठी फौज रवाना केली; तिला मालोजीनं अर्ध्या वाटेंत गांठून इ. स. १६०३ त खरपूस चोप दिला व आपल्या पराक्रमाची नांदी वाजविली.

मालोजीसारखा सिंह छातीचा लढवय्या आपणांस मिळाल्यास त्याच्या मदतीनं शत्रुसैन्याचा तेव्हांच फन्ना उडवतां येईल या स्वार्थी विचारानं मालोजीच्या हेतूंबद्दल पसंती दर्शवून शहानं त्याला बारा हजारांची मनसबदारी, राजे हा किताब, शिवनेरी, चाकण हे किल्ले; पुणें, सुपें, इंदापूर हे परगणे व आणखी कांही सभोंवारच्या मुलुखाच्या देशमुख्या देऊन त्याला जाधवरावांच्या तोडीचा सरदार बनविलं. मालोजी आतां स्वपराक्रमानं सरदार मालोजीराव भोंसले बनला.

कर्तृत्ववान् माणसाला जगांत अशक्य असं कांहींच नसतं. त्याच्या कर्तबगारीला वाव मिळण्यास संधि यावी लागते. मालोजीस जाधवरावांनीं ती अनायासं मिळवून दिली. याबद्दल मालोजी त्यांचा खरोखर ऋणी आहे.

अंधकारमय जीवनांत चांचपडणाऱ्या मराठ्यांनीं आपल्या उन्नतीचा मार्ग आत्मविश्वासानं बाहुबलावर चोखाळण्यास सुरवात करून स्वतःची ईर्षा कशी तडीस नेली हें मालोजीच्या उदाहरणानं आपणांस स्पष्ट कळून चुकलंच. हाच **मराठेशाहीचा खरोखरीचा प्रभातकाळ.** या संधिप्रकाशांत मर्दांच्या-मर्दुमकीला कोणतं नवं वळण लागलं व त्यांनीं आपल्या अचाट पराक्रमानं दशदिशा कशा विद्धं करून टाकिल्या हें पुढं पाहूं—

★

वाचनालय शाखा

दा. क्र. 3930
वि. वा.

IRBK-0103130
IRBK-0103130